Nourishing Prosperity

# ॲग्रिसर्च (इंडिया) प्रा.लिमिटेड

आय.एस.ओ. ९००१:२०१५ व १४००१:२०१५ प्रमाणित कंपनी

CIN : U73100MH2000PTC124501

## 'द्राक्षबाग' खरड छाटणीचे अन्नद्रव्य व्यवस्थापन (प्रतिएकर)

महाराष्ट्रातील द्राक्ष पिक घेणाऱ्या बऱ्याच भागांमध्ये समशीतोष्ण वातावरणात द्राक्ष वेलींची वाढ ही वर्षभर जोरात होत असते. ही वाढ जर अशीच होऊ दिल्यास फळधारकतेवर विपरीत परिणाम होऊ शकतात. त्यामुळे आपण बागेत दोन वेळेस छाटणी करतो. फळ काढणी झाल्यानंतर खरड छाटणी घेतली जाते. ओलांड्यावर फक्त एक डोळा ठेवुन जुनी काडीपुर्णपणे काढून टाकण्याच्या प्रक्रियेला खरड छाटणी असे म्हणतात.

*** छाटणी पुर्व व्यवस्थापन :**

**१) वेलीची झिज भरून काढणे :**

वेलीवर चांगल्या दर्जाचा घड तयार होण्याकरिता लागणारे अन्नद्रव्य हे वेलींमधून वापरले जातात. त्यामुळे वेल फळ काढणी झाल्यानंतर अशक्त झालेली असते. वेलीची झीज भरून काढण्यासाठी फळ काढणी ते खरड छाटणी मध्ये कमीतकमी तीन आठवड्यांचा कालावधी ठेवावा व एक ते दोन दिवसाआड पाणी व थोडेसे नत्र, स्फुरद व पालाश चालू ठेवावे.

**२) चारी घेणे :**

दोन वेलींमध्ये बुंध्यापासून ९ इंच सोडून ३ ते ४ इंच खोल अशी २ फुट रूंद चारी घ्यावी. यामुळे बऱ्याच मुळ्या तुटतील व भरपुर पाणी दिल्यानंतर नविन पांढरी अशी कार्यक्षम मुळी तयार होईल. जेथे पाण्याची कमतरता असेल किंवा दुष्काळाची परिस्थिती असेल त्यांनी चारी घेण्याची प्रॅक्टिस करू नये. कारण जर पाणी कमी पडले तर नविन मुळ्या खुप कमी फुटतील व झाडाला शॉक बसू शकेल व त्याचा विपरीत परिणाम घड निर्मितीवर होऊ शकेल.

**३) चारीमध्ये शेणखत व रासायनिक खत भरणे : (छाटणीपुर्वी १० ते १५ दिवस)**

शेणखत @ ५ टन + सुपर फॉस्फेट @ २०० किलो

+ डि.ए.पी. @ ५० किलो + एस.ओ.पी. @ २५ किलो

+ थायोग्रीन @ ६ किलो + ॲम्पल – जी @ १६ किलो

*** छाटणी नंतर व्यवस्थापन :**

- छाटणीनंतर ६० ते ७० दिवसांमध्ये सल्फेट ऑफ पोटॅश (SOP) ५० किलो प्रति एकर द्यावे.
- **ड्रिपद्वारे द्यावयाची खतांची मात्रा (प्रति एकर) :**

| कालावधी | खतांचा प्रकार | मात्रा |
|---|---|---|
| छाटणी नंतर लगेच | रिलीज हायपी (१२:६१:००) | ८ किलो |
| छाटणीनंतर १० दिवसांनी | युरीया<br>+ मिंगल<br>+ मॅग्नेशिअम सल्फेट | ५ किलो<br>२ किलो<br>१० किलो |
| छाटणीनंतर १५ दिवसांनी | रिलीज हायपी (१२:६१:००)<br>+रिलीज इन्स्टा (१९:१९:१९) | ८ किलो<br>५ किलो |
| छाटणीनंतर २२ दिवसांनी | रिलीज झिंक<br>+ रिलीज हायपी (१२:६१:००)<br>+ प्रोबियॉन | ५०० ग्रॅम<br>८ किलो<br>१ लिटर |
| छाटणीनंतर ३० दिवसांनी | रिलीज हायपी (१२:६१:००)<br>+ रिलीज बुन (००:५२:३४) | ५ किलो<br>५ किलो |
| छाटणीनंतर ३७ दिवसांनी | रिलीज बुन (००:५२:३४) | ८ किलो |
| छाटणीनंतर ४५ दिवसांनी | मिंगल<br>+ मॅग्नेशियम सल्फेट<br>+ प्रोबियॉन | २ किलो<br>१० किलो<br>१ लिटर |
| छाटणीनंतर ५२ दिवसांनी | रिलीज बुन (००:५२:३४)<br>+ थायोग्रीन | ८ किलो<br>१.५ किलो |
| छाटणीनंतर ६० दिवसांनी | रिलीज बुन (००:५२:३४) | ८ किलो |



| | | |
|---|---|---|
| छाटणीनंतर ६७ दिवसांनी | रिलीज बुन (००:५२:३४)<br>+ थायोग्रीन | ८ किलो<br>१.५ किलो |
| छाटणीनंतर ७५ दिवसांनी | रिलीज क्रोम (००:००:५०) | ८ किलो |
| छाटणीनंतर ८१ दिवसांनी | रिलीज क्रोम (००:००:५०) | ८ किलो |
| छाटणीनंतर ८८ दिवसांनी | रिलीज क्रोम (००:००:५०) | ८ किलो |
| **फवारणीद्वारे द्यावयाची अन्नद्रव्ये (प्रति एकर)** | | |
| **कालावधी** | **खतांचा प्रकार** | **मात्रा (२०० लि. पाण्यासाठी)** |
| छाटणीनंतर २५ ते ३० दिवसांनी | एक्सिड<br>+ रिलीज फेरस<br>+ रिलीज बुन (००:५२:३४) | २५० ग्रॅम<br>१०० ग्रॅम<br>५०० ग्रॅम |
| छाटणीनंतर ४० दिवसांनी | झिलबोर<br>+ रिलीज झिंक<br>+ बेंझ (6BA)<br>+ रिलीज बुन (००:५२:३४) | १०० ग्रॅम<br>१०० ग्रॅम<br>१० PPM<br>६०० ग्रॅम |
| छाटणीनंतर ४५ दिवसांनी | झिंकाबोर<br>+ कॅलमिनो<br>+ युरॅसील (गरजेनुसार)<br>+ रिलीज बुन (००:५२:३४) | ५०० मिली<br>१०० ग्रॅम<br>२५ ग्रॅम<br>६०० ग्रॅम |
| छाटणीनंतर ५० दिवसांनी | झिलबोर<br>+ रिलीज झिंक<br>+ बेंझ (6BA)<br>+ रिलीज बुन (००:५२:३४) | १०० ग्रॅम<br>१०० ग्रॅम<br>१० PPM<br>६०० ग्रॅम |
| छाटणीनंतर ५७ दिवसांनी | झिंकाबोर<br>+ कॅलमिनो<br>+ रिलीज बुन (००:५२:३४)<br>+ युरॅसील (गरजेनुसार) | ५०० मिली<br>१५० ग्रॅम<br>६०० ग्रॅम<br>२५ ग्रॅम |
| छाटणीनंतर ७० दिवसापासून (फुटीचे टोकापर्यंत पाने पक्व झाल्यानंतर दर १० ते १५ दिवसांनी) ते ऑगस्ट अखेरपर्यंत | बोर्डोमिक्चर ०.५ ते १ %<br>+ थायोसल्फ | गरजेनुसार<br>२०० ग्रॅम |

- **ॲम्प्ल :** तापमानात होणाऱ्या बदलांमुळे, पाण्याचा ताण व इतर ताणामुळे वेलींची चयापचय क्रिया मंदावते. ती वाढविण्यासाठी ॲम्पल २ मि.ली. लिटर पाण्यात घेऊन फवारणी करावी.
- **संचार – ४० :** डाऊनी मिल्ड्युच्या प्रभावी नियंत्रणासाठी संचार – ४० @ ५०० मिली प्रति २०० लिटर पाणी + एखादे स्पर्शजन्य बुरशी नाशकाचा (कॉपर व सल्फर युक्त सोडून) गरजेनुसार स्प्रे द्यावा.
- चुनखडीयुक्त व अल्कधर्मी जमिनीमध्ये लोहाची कमतरता जाणवत असल्यास 'लोहाड्रीप' चाच वापर करावा. लोहाड्रीप एकरी ५०० ग्रॅम ते १ किलो आयर्नच्या कमतरतेच्या तीव्रतेनुसार ड्रिपद्वारेच द्यावे. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये मोठ्या प्रमाणात झिंक व मँगनीज ची कमतरता दिसुन येते. त्यासाठी रिलीज झिंक व रिलीज मँगनीज प्रत्येकी एकरी ५०० ग्रॅम ते १ किलो ड्रिपद्वारे द्यावे.

**सुचना : १) सबकेन** करावयाची असल्यास शेंडा ९ पानावर आल्यानंतर ७ व्या पानावर सबकेन करावी. सबकेन करावयाची नसल्यास काडीला १४ ते १५ पाने आल्यावर शेंडाबाळी व शेंडा खुडावा.

**२) कॅनॉपी व्यवस्थापन (अति महत्वाचे मुद्दे) :**

**अ)** काड्यांची संख्या – ९X५ फूट अंतरामध्ये २५ ते ३० काड्या **ब)** फुटींची लांबी – ८५ ते ९० सेमी **क)** पेऱ्यातील लांबी – ५ ते ५.५ सेमी.
**ड)** काडी वरील पानांची संख्या – १५ ते १६ **इ)** काडीची जाडी – ८ ते १० मिमि. असणे गरजेचे आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क : ९६०७९१०९४०, ९६०७९१०९३५, ९६०७९१०९८३, ९६०७९१०९३७, ९६०७९१०९४५, ९३७०५१०९८९**